# जाहिरात

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाचे आस्थापनेवरील विधी अधिकारी (गट-ब) ही पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. त्या पदाकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम व कार्यालय | मंजुर पदे |
|---|---|---|
| १ | विधी अधिकारी गट ब अपोमसं गुअवि पुणे | ०२ |

सुचना :- उमेदवाराने **www.mahacid.gov.in** या राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेला विहीत नमुन्यातील अर्ज परिपुर्णरित्या भरुन दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी १०:०० ते सायंकाळी ०६:१५ वा) अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग,महाराष्ट्र राज्य, पुणे विद्यापीठ चौक, पाषाण रोड, मॉर्डन लॉ कॉलेज शेजारी चव्हाणनगर, पुणे-४११००८ या पत्यावर पोहचतील या बेताने पाठवावेत.

ठिकाण :- पुणे
दिनांक

(सारंग आवाड)
पोलीस उप महानिरीक्षक, (प्रशासन)
अपोमसं, गुअवि., म.राज्य, पुणे यांचेकरीता

## जाहिरातीचा नमुना

अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाचे आस्थापनेवर विधी अधिकारी (गट-ब) २ पदे मंजूर आहेत. विधी अधिकारी (गट-ब) चे २ पदे ११ महिन्याच्या करारावर कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत . त्याकरीता www.mahacid.gov.in या संकेतस्थळावर सदरची विस्तृती स्वरुपातील जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. या पदाकरिता नमूद अटी/शर्ती व शैक्षणिक पात्रता पुर्ण करीत असलेल्या उमेदवारांकडुन ११ महिन्यांकरीता पूर्णत: कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | पदाचे नाव | एकूण पदे | एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन दूरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|
| १. | विधी अधिकारी (गट-ब) | ०२ | रू. २५०००/- + रू. ३०००/- |

इच्छुक उमेदवारांची सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालुन लिफाफ्यावर उजव्या बाजुला ठळक अक्षरात विधी अधिकारी (गट-ब) पदासाठी अर्ज असे स्पष्ट नमुद करुन दोन रंगीत फोटो अर्जासोबत जोडुन अर्ज दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायं ०६.१५ वा. पर्यंत अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे विद्यापीठ चौक, पाषाण रोड मॉर्डन लॉ कॉलेज शेजारी चव्हाणनगर, पुणे ४११००८ या पत्यावर पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. तसेच अर्जात त्यांचा दुनध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी यांचा स्पष्टपणे उल्लेख करावा.

**टिप- वर दर्शविलेल्या पदसंख्येत बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रियेमध्ये अंशत: बदल करणे स्थगित करणे परिक्षा कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील.**

**करारातील मासिक देय रक्कम**

अ) विधी अधिकारी (गट-ब) पदाकरीता करारातील मासिक देय रक्कम रु. २५,०००/- + दूरध्वनी व प्रवास खर्च रु. ३०००/- असे एकूण रु २८,०००/- दरमहा देय राहतील (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा अनुभव**

१. **शैक्षणिक अर्हता** - उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा कायदयाचा पदवीधर असेल तो सनदधारक असेल

२. **वयोमर्यादा** -

अ) विधी अधिकारी (गट-ब) या पदासाठी उमेवाराचे वय १२ फेब्रुवारी २०२५ रोजी ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायदयांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**३. अनुभव**

अ) विधी अधिकारी (गट-ब) या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

ब) उमेदवारास गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक प्रशासनिय अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञान संपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

क) उमेदवारास मराठी, हिंदी इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असले पाहिजे.

**निवड प्रक्रिया -**

संपूर्ण निवड प्रक्रिया हि ७५ गुणांची असेल त्याचे विवरण खालीलप्रमाणे

अ) लेखा परीक्षा- ५० गुण, वेळ १ तास १५ मि.

भाग १ - वर्णनात्मक (Descriptive Type) २५ गुण

मा. उच्च न्यायालय/ मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण समक्ष एखादया प्रकरणात दाखल करावयाचे परिच्छेद निहाय अभिप्राय किंवा शपथपत्र (संक्षिप्त स्वरुपात) सादर करण्याबाबतचे ज्ञान संबंधीत उमेदवारास आहे काय ? हे अजमाविण्यात येईल.

भाग २ - वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (Objective Type) २५ गुण

सेवा विषयक व फौजदारी स्वरुपाच्या प्रकरणांमध्ये, तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रकरणांमध्ये तसेच फौ.प्र.सं. १९७५ मधील कलम १९७ किंवा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम १९९९ मधील प्रकरणात अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यासाठी सक्षम प्राधिका-यास सुलभ निर्णय घेता येईल अशा प्रकरणांची छाननी करण्याची क्षमता तपासणारे प्रश्न, तसेच सध्याची न्यायिक स्थिती (settled postion of law) काय आहे तसेच भा.द.वि. बाबतच्या ज्ञानाचे आकलन करणा-या प्रश्नांचा समावेश असेल.

ब) मुलाखत - २५ गुण

## कर्तव्य व जबाबदाऱ्या

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे

२) सेवाविषयक/ प्रशासकीय बाबी/ विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवून न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे

७) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवळी नमुद केलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

८) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

## अटी व शर्ती

१) सदर पदांची नेमणूक ही पूर्णत : कंत्राटी पध्दतीने असेल उमेदवाराला शासकीय कर्मचारी / अधिकारी म्हणून गणले जाणार नाहीत.

२) सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी भरण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवळी (जास्तीत जास्त १ +२ = ३ वेळा अशी एकूण ३३ महिन्यांकरिता) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिका-यांचे सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी

व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याचे शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) लेखी परीक्षेत पात्र ठरणा-या उमेदवारांमधून मुलाखतीव्दारे अंतिम निवड करण्यात येईल मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल. लेखी परीक्षेचा दिनांक, वेळ व ठिकाण तसेच निकाल अंतिम निवड याबाबतची माहिती उमेदवारांना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिली जाईल.

५) उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

६) नियुक्ती केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) करुन देणे अनिवार्य राहील.

७) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी/ कर्मचा-यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

८) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रत्येक आठवडयात कायदेविषयक सल्ला देण्यासाठी कमीत कमी ३० तासांचा कालावधी देणे बधनकारक राहील.

९) उमेदवारांनी वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. स्वाक्षरी नसलेले अर्ज व त्याबाबतचे इतर संबधीत साक्षकींत नसलेले कागदपत्रे ग्राहय धरले जाणार नाही.

१०) अर्जासोबत २.५ से.मी. X २.५ से.मी. आकाराचे सध्याने काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

११) विधी अधिकारी (गट-ब) भरतीसाठी करण्यात येणारा पत्रव्यवहार हा ई-मेल व मोबाईलव्दारे करण्यात येईल.

१२) उमेदवारांनी त्यांचे अर्ज ( परिपूर्ण व व्यवस्थित भरलेल्या विहीत नमुन्यातील त्यांची स्वाक्षरी असलेला अर्ज ) मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे ४११००८ या पत्त्यावर दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ पर्यंत पाहोचेल अशा बेताने पाठवावेत दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**अपर पोलीस महासंचालक,**
**गु.अ.वि., म.राज्य, पुणे यांच्या मान्यतेने**

२८/१/२५

**( सारंग आवाड )**
पोलीस उप महानिरीक्षक, (प्रशासन)
अपोमसं, गुअवि., म.राज्य, पुणे यांचेकरीता

# अर्जाचा नमुना

विधी अधिकारी, गट-ब पदाकरीता अर्ज.

कार्यालयीन उपयोगासाठी

१. अर्ज क्रमांक

२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक

३. अर्ज स्विकारल्याचा दिनांक (स्वाक्षरीसह)

सुचना :- १. अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शवलेल्या ठिकाणीच माहिती फक्त इंग्रजीत लिहावी, आवश्यक नसेल ते खोडावे.

२.अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :-

१. अर्जचाराचे संपूर्ण नाव :- आडनाव नाव वडिलांचे / पतीचे नाव

मराठीत :

इंग्रजीत :

२. पत्रव्यवहाराचा पत्ता:-

तालुका : जिल्हा : पीन कोड :

३. कायमचा पत्ता :-

तालुका : जिल्हा : पीन कोड :

४. दुरध्वनी क्रमांक :- लँडलाईन---------------------------- भ्रमणध्वनी क्रमांक -------------------------------

४ (अ) ई-मेल पत्ता-

५. जन्मदिनांक :-

दिवस महिना वर्ष जन्मस्थळ

६. दिनांक ---/ ०१/२०२५ रोजीचे वय :

७. लिंग: पुरुष/ महिला

८. धर्म -------------------------------- जात --------------------------------

९. क्रिमिलेअर आहेत काय: होय / नाही

योग्य असेल त्या ठिकाणी ( ) अशी खुण करावी.

१०. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय? होय / नाही

ब) अर्जदाराची शैक्षणीक माहिती:

११. शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थचे नाव (विदयालय/ महाविदयालय) | बोर्ड / विदयापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १० वी ) | | | | | |
| २. पदवी | | | | | |
| ४. पदव्युत्तर | | | | | |
| ५. विधी पदवी | | | | | |

१२. इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षीत आहेत काय? होय / नाही

१३. अर्जदाराची इतर माहिती :

अ) सनद घेतल्याचा दिनांक

ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील

| अ.क्र | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

टिप :- वकीली व्यवसाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१४. अ) अर्जदारावर यापुर्वी कोणत्याही अपराधाबद्दल कधीही अटक करण्यात/ स्थानबध्द करण्यात/ दंड करण्यात /सिध्ददोषी ठरविण्यात आले आहे काय ? किंवा लोकसेवा आयोगाकडुन त्यांच्या परिक्षाणांना/ निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? किंवा अनअर्हता ठरविण्यात आले आहे काय ? किंवा कोणत्याहि परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? किंवा काढुन टाकण्यात आले आहे काय ? होय / नाही

१४ ब) हा अर्ज भरतेवळी कोणत्याही न्यायालयात, किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणात/ संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? होय / नाही

(१४- अ किंवा १४-ब चे उत्तर होय असले तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षा आदेश इत्यादींचा संपुर्ण तपशील आणि न्यायालय / विदयापीठ / प्राधिकरण इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरुप स्पष्ट करावे.)

# <u>अर्जपदाराने दयावयाचे प्रतिज्ञापत्र</u>

मी श्री/सौ/कु.---------------------------------------------------------------------------- याव्दारे असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो /करते की मी वरील माहिती जाणीव तसेच विश्वासुपूर्वक दिली असुन ती खरी आहे. जाहिरातीत दिलेले सर्व निकष व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळुन आल्याने माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्यावर माझी निवड/ नियुक्ती रद्द केली गेल्यास त्याबाबत माझी काही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील. व त्याबाबत माझ्याविरुध्द होणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र राहील. तसेच मी भरतीप्रक्रियेत कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारांचा अवलंब केल्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनाक :-

अर्जदाराची सही